पोलीस अधीक्षक, कार्यालय गडचिरोली
जनसंपर्क शाखा
P.R.O Office, Gadchiroli
**Phone No.** 07132223142 **Address**: SP Office,Gadchiroli
**E-mail** : prospoffice.gadchiroli@gmail.com

# वार्तापत्र

**दिनांक- ०५/०२/२०२१**

## गडचिरोली पोलीस दल व सीएलपी इंडिया आणि प्रथम एज्युकेशन फॉऊंडेशन यांच्या पुढाकाराने मिळाले १५० बेरोजगार युवक-युवतींना हॉस्पिटॅलिटी ऑटोमोबाईल प्रशिक्षण

गडचिरोली जिल्हा हा अतिदुर्गम, नक्षलग्रस्त, अतिसंवेदनशिल व आदिवासी बहुल असून, जिल्हा मुख्यालयापासुन दुर अंतरावर राहणाऱ्या येथील गरीब आदिवासी युवक-युवतींना रोजगाराच्या संधीचा फायदा वेळेवर मिळत नाही. याच बाबीचा फायदा घेत नक्षलवादी आदिवासी युवकांच्या शिक्षणाला विरोध करुन वेगवेगळया भुलथापा देवुन जनतेमध्ये लोकशाही विरुध्द अपप्रचार करतात व नक्षल दलममध्ये भरती होण्यास प्रवृत्त करुन आदिवासी युवक-युवतींचे भविष्य उध्वस्त करीत आहेत. गडचिरोलीतील अनेक तरुण-तरुणी गुणवत्ताधारक आहेत परंतु योग्य आत्मविश्वास व संधीच्या अभावामुळे ते रोजगाराकडे न वळता वाममार्गाकडे वळतात. हीच बाब विचारात घेवुन, गडचिरोली जिल्हयातील युवक-युवतींना रोजगाराची संधी मिळावी व ते आत्मनिर्भर व्हावेत तसेच त्यांना आपले जीवनमान उंचावुन चांगले नागरीक म्हणुन जगता यावे यासाठी गडचिरोली पोलीस दल सदैव प्रयत्नशिल आहे. याच उद्देशाने गडचिरोली पोलीस दलाने “रोजगार मेळावा” हे ॲप तयार केले असून या ॲप मध्ये पाच हजार बेरोजगार युवक-युवतींनी आपली नाव नोंदणी केली आहे. या ॲपचे माध्यमातुन आतापर्यंत १३४६ बेरोजगार युवक-युवतींना रोजगार प्राप्त झाला असुन, इच्छुक बेरोजगार युवक-युवतींकरीता कौशल्यावर आधारीत विविध प्रशिक्षण सुध्दा राबविण्यात येत आहेत. नुकताच बी.ओ.आय. स्टार आरसेटी गडचिरोली यांचे मार्फतीने ९५ युवक-युवतींना ब्युटीपार्लर, कुक्कुटपालन व मत्स्यपालनचे व्यावसायिक प्रशिक्षण देवुन स्वयंरोजगाराची संधी उपलब्ध करुन देण्यात आली आहे. याचाच एक भाग म्हणुन मा. पोलीस अधीक्षक श्री. अंकित गोयल सा़े. यांचे मार्गदर्शनाखाली गडचिरोली जिल्हा पोलीस दलाच्या वतीने सदर ॲप मधुन सीएलपी इंडिया आणि प्रथम एज्युकेशन फॉऊंडेशन, यवतमाळ यांचे मार्फतीने १५० युवक-युवतींची हॉस्पिटॅलिटी व ऑटोमोबाईल प्रशिक्षणाकरीता निवड झाली आहे.

गडचिरोली पोलीस दलाच्या पुढाकाराने हॉस्पिटॅलिटी व ऑटोमोबाईल प्रशिक्षणाकरीता निवड झालेल्या १५० युवक-युवतींचा नियुक्ती प्रमाणपत्र वाटप व सत्कार समारंभ नुकताच दिनांक ०५ फेब्रुवारी २०२१ रोजी पार पाडण्यात आला. सदर कार्यक्रम मा. पोलीस अधीक्षक श्री अंकित गोयल सा़ो. यांचे मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आला असुन, मा. पोलीस अधीक्षक सा़ो. यांनी प्रशिक्षणाकरीता निवड झालेल्या युवक-युवतींना नियुक्ती प्रमाणपत्र देवुन त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. तसेच सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी, पोस्टे, उपपोस्टे व पोमकेंचे सर्व प्रभारी अधिकारी व गडचिरोली पोलीस दलाच्या वतीने सदर उपक्रम राबवित असलेल्या नागरी कृती शाखेच्या टीमचे कौतुक केले. गडचिरोली जिल्हयातीत तरुण-तरुणी गुणवत्ताधारक असुन योग्य संधी त्याच्यापर्यंत पोचत नसल्यामुळे ते वंचित राहतात. त्यांना विविध संधीचा लाभ मिळवुन देण्यासाठी गडचिरोली पोलीस दल सतत प्रयत्नशिल आहे. त्याकरीता विविध सेवाभावी संस्थेंच्या (एनजीओच्या) मदतीने त्यांना संधी मिळवुन देण्याचा प्रयत्न गडचिरोली पोलीस दल करीत आहे. असे आपल्या मार्गदर्शनपर भाषणात सांगितले.

यावेळी मा. अपर पोलीस अधीक्षक (अभियान) श्री. मनिष कलवानिया सा़ो., मा. पोलीस उपअधिक्षक अभियान श्री. भाऊसाहेब ढोले सा़ो. मा. प्रभारी पोलीस उपअधिक्षक डॉ. विशाल जयस्वाल सा़ो. प्रथम एज्युकेशन फॉऊंडेशनचे, प्रमुख क्लस्टर हेड मा. श्री आशिष इंगळे, रिजनल अकॅडेमिक हेड हॉस्पिटॅलीटी टीम मा. कु. भाग्यश्री दशमुखे, सेंटर हेड, ऑटोमोटीव्ह सेंटर मा. श्री. संदीप तंत्रपले, कॉऊंसेलर श्री. किशोर काळे हे उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरीता गडचिरोली जिल्हयातील सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी, पोस्टे, उपपोस्टे व पोमकेंचे सर्व प्रभारी अधिकारी, सीएलपी इंडिया आणि प्रथम एज्युकेशन फॉऊंडेशन, यवतमाळ तसेच नागरी कृती शाखेचे प्रभारी अधिकारी सपोनि महादेव शेलार व अंमलदार यांनी अथक परिश्रम घेतले.






